# मनात येईल तेव्हा...राज ठाकरेंची 'मनसे' स्टाईल

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा पक्ष म्हणजे 'मनाला येईल तेव्हा...' असा पक्ष झाला आहे. गर्दीकडे बोट दाखवत 'मनसे पक्ष संपला नाही' असे काल राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे जेव्हा भाषणाला उभे राहतील तेव्हा गर्दी जमणारच आहे. कारण ते भाषण उत्तम करतात. नाना पाटेकरांच्या कार्यक्रमालाही गर्दी जमते. पण म्हणून कुणी आलं मनात, बोललो भाषणात असे करीत नाही. राज ठाकरेंचे मात्र तसं झालंय, खूप महिने झाले की त्यांना बहुदा भाषण ठोकावसं वाटतं. त्यामुळे मग मनात येईल तेव्हा... सुरू असतं.

गुढीपाडव्याच्या दिवशी राज ठाकरे ८० मिनिटं बोलले. पण त्या भाषणातील प्रत्येक मुद्दा हा सामान्य माणसाला आधीच माहीत आहे. किंबहुना सामान्य माणसाला तो अधिक चांगला माहीत आहे. कारण राज ठाकरे भाषणात जे सांगत होते ते सामान्य माणूस प्रत्यक्ष भोगतो आहे. त्या संकटांशी सामान्य माणूस रोज झुंज देतो आहे. पण त्याची शक्ती कमी पडते, त्यामुळे तो बलवानाचा पाठिंबा शोधत फिरतो. आपल्या संकटातून मार्ग दाखवेल अशा नेत्याचा शोध घेत राहतो. नेत्याच्या भेटीसाठी शंभर वेळा त्याच्या दाराशी जातो. नेत्याने कागदपत्र हातात घेतले तरी आपला नेता काहीतरी करील या विश्वासावर छाती फुगवून चार दिवस हिंडतो आणि मग काहीच होत नाही, हे कळल्यावर दुसऱ्या नेत्याचा शोध सुरू होतो. सामान्य माणसाची आज ही स्थिती आहे. अशा जनतेला सभेत त्याचीच दुखणी सांगता आणि त्यालाच सावध राहण्याचा इशारा देता? हे सगळं जर सामान्य माणसाने स्वतःच करायचे आहे तर तुमची गरजच काय आहे? नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांना भरपूर मदत तरी दिली, पण राज ठाकरे कोणत्याच आंदोलनाच्या मागे खंबीरपणे उभे राहत नाहीत. सगळी संकटं सांगितली, पण त्यावर उपाय म्हणून एखादे आंदोलन जाहीर केले नाही किंवा एखादा कार्यक्रम दिला नाही. प्रत्येक भाषणात संकटांचा पाढा वाचायचा आणि त्यावर एकही उपाय सांगायचा नाही, हेच घडत आलंय. काल शिवाजी पार्कवरील भाषणातही तेच झाले.

राज ठाकरेंच्या भाषणात पुढे काय करायचं ते सांगितलं जात नाही. त्यामुळे मनसे कार्यकर्ते भाषण संपल्यावर एक दोन गरीब फेरीवाल्यांना ठोकतात नाहीतर एक दोन पाट्या फोडतात. मग पुन्हा पुढच्या भाषणाची वाट पाहत बसायची अशी कार्यकर्त्यांची दयनीय अवस्था आहे.

राज ठाकरे नेहमी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल भरभरून बोलतात. शिवाजी महाराज जर रायगडावर दरबारात बसून भाषण देत राहिले असते तर स्वराज्य मिळाले असते का? शिवाजी महाराजांनी जीवाला जीव देणारे सैन्य उभे केले, आपल्या प्रजेला संरक्षण दिले, हत्यारे, दारूगोळ्यासाठी तर सुरत लुटले, आक्रमणं करून शत्रूला परतवलेच पण त्या परिसरासाठी उत्तम सेनापती नेमून त्यांच्यावर जबाबदारी सोपवली, या बाबींचे मनसे पक्षाच्या जडणघडणीत कुठेही प्रतिबिंबच दिसत नाही. जर समर्थ रामदास नुसते उपदेश देत फिरले असते तर उपयोग काय झाला असता? समर्थ रामदासांनी स्वराजाच्या सैन्यासाठी बलवान तरुणांची फौज निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी हनुमान मंदिरे बांधली, मठ उभारले आणि त्यात शारीरिक कसरती करून स्वराज्याच्या लढ्यासाठी तयार राहा, असा संदेश दिला. नेत्याने भाषण देऊन चैतन्य निर्माण करायचं आणि त्या चैतन्यातून संकटावर मात करण्याची दिशा ठरवून पुढे मार्गक्रमण करायचे असते. पण मनसे एकाच जागी थबकली आहे. राज ठाकरेंनी पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा अभ्यास करण्याची गरज आहे.



मनसेची स्थापना झाली तेव्हा शरद पवार म्हणाले होते की, राजकीय नेता बनण्यासाठी लवकर उठावे लागते. हल्ली राज ठाकरे शरद पवारांना दोनदा भेटले. त्यांची जेव्हा तिसरी भेट होईल तेव्हा तमाम मराठी बांधवांतर्फे शरद पवारांना एक विनंती आहे, शरद पवारांच्या सांगण्यामुळे राज ठाकरे जर लवकर उठायला लागले असतील तर शरद पवारांनी त्यांना आणखी एक उपदेश द्यावा. राजकारणात यशस्वी बनायचं असेल तर जनतेच्या भल्यासाठी महत्त्वाच्या प्रश्नावर एक तरी आंदोलन छेडायला हवं. रेल्वे भरतीपासून नाणार ते बेस्ट आणि मेट्रोमुळे जाणारी मराठी माणसांची घरं असे अनेक प्रश्न घेऊन राज ठाकरेंकडे लोक येतात. त्यांना वाऱ्यावर सोडण्यापेक्षा मनसेची ताकद दिली तर इंजीन धावू लागेल नाहीतर दर सभेत फक्त शिट्टीच वाजेल.

राज ठाकरे रोज एक चित्रपट बघतात असे सर्व जण म्हणतात. म्हणून चित्रपटातील डायलॉग त्यांना पाठ आहेत, नक्कलही हुबेहूब करतात. त्यामुळे इतकंच सांगायचे आहे की, ज्या चित्रपटात हीरो लढत नाही तो चित्रपटच तोंडावर आपटतो. नाना पाटेकर सतत म्हाताऱ्यासारखं बोलतो असं म्हणून त्यांची चेष्टा केली, पण नाना पाटेकरच बरा आहे, असे म्हणण्याची वेळ तमाम मराठी बांधवांवर येऊ नये.